# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीचा जागतिक विक्रम; ५,३४८ जणांनी साकारल्या शाडूमातीच्या गणेशमूर्ती

### जेईएस महाविद्यालयाच्या प्रांगणात शाडू मातीपासून एकाच दिवशी गणेशमूर्ती निर्मिती; जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचाही उत्स्फूर्त सहभाग


दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी








वर्ष : ०१ ले * अंक : ३५ * जालना * * शनिवार ०५ सप्टेंबर २०२६ * * पाने : ४ * *किंमत : २ रूपये *










जालना, दि. ४ : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणसंवर्धनाचा प्रभावी संदेश देत जालना जिल्ह्याने एक अनोखा विश्वविक्रम आपल्या नावे केला. जालना शहरातील जेईएस महाविद्यालयाच्या प्रांगणात एकाच वेळी तब्बल ५ हजार ३४८ जणांनी शाडूमातीपासून गणेशमूर्ती साकारत जागतिक विक्रम प्रस्थापित केला. या ऐतिहासिक उपक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद व मान्यता मिळाल्याने जालन्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व शिक्षण विभाग, अद्विक क्लब तसेच दिव्य मराठी यांच्या समन्वयातून हा भव्य पर्यावरणपूरक उपक्रम आयोजित करण्यात आला. हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत एकाच ठिकाणी, एकाच वेळी शाडूमातीच्या गणेशमूर्ती तयार केल्या. २८ ऑगस्ट २०२२ रोजी बंगळुरू येथे ३ हजार ३०८ सहभागींच्या उपस्थितीत एकाच वेळी गणेशमूर्ती साकारण्याचा विक्रम नोंदविण्यात आला होता. जालन्यात झालेल्या उपक्रमात ५ हजार ३४८ जणांनी सहभाग घेत हा विक्रम मोडीत काढला. म्हणजेच पूर्वीच्या विक्रमापेक्षा तब्बल २ हजार ४० सहभागी अधिक सहभागी झाले. या विक्रमामुळे जालना जिल्ह्याचे नाव केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवरही पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या माध्यमातून अधोरेखित झाले आहे.

शाडूमातीच्या गणेशमूर्तींचा संदेश गणेशोत्सव हा श्रद्धेचा आणि उत्साहाचा सण असला तरी त्यातून पर्यावरणाचे नुकसान होऊ नये, यासाठी जनजागृती करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. प्लास्टर ऑफ पॅरिससारख्या पर्यावरणाला हानीकारक साहित्याचा वापर टाळून नैसर्गिक आणि सहज विघटनशील शाडूमातीच्या गणेशमूर्तींचा स्वीकार करावा, असा संदेश विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी आपल्या कृतीतून दिला. हजारो हातांनी एकाच वेळी गणेशमूर्ती साकारल्याने जेईएस महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर गणेशमय झाला होता. विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत होता. स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती घडविण्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचाही उत्स्फूर्त सहभाग जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत शाडूमातीपासून गणेशमूर्ती साकारली. त्यांच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह आणखी वाढला. यावेळी त्यांनी उपस्थितांना पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, जलसंवर्धन आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला. विश्वविक्रम हा केवळ आकडा नसून, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी समाजाने आणि विशेषतः नव्या





पिढीने घेतलेला सामूहिक संकल्प आहे, असे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले. हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग उपक्रमात जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक सहभागी झाले होते. कार्यक्रमस्थळी आवश्यक साहित्याचे नियोजन, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, मार्गदर्शन, मूर्ती निर्मितीची प्रक्रिया आणि संपूर्ण कार्यक्रमाचे व्यवस्थापन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रशिक्षक आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाडूमाती मळून त्यापासून गणेशमूर्ती साकारल्या. हजारो





विद्यार्थ्यांनी एकाच वेळी हातात शाडूमाती घेऊन बाप्पाची मूर्ती घडविण्याचे दृश्य उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरले. प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्वयंसेवकांचे योगदान या विक्रमी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा परिषद व शिक्षण विभागातील अधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक, अद्विक क्लब, दिव्य मराठीची टीम, स्वयंसेवक, समन्वयक तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या नियोजनापासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत सर्वांनी समन्वयाने काम केल्यामुळे हजारो सहभागींच्या उपस्थितीत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. एकाच वेळी सर्वाधिक व्यक्तींनी शाडूमातीपासून गणेशमूर्ती साकारण्याचा विक्रमुर केल्याने जालन्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

## भाजप प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांच्या मध्यस्थीला यश; मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक

जालना/प्रतिनिधी : ब्राह्मण समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी गेल्या पाच दिवसांपासून जालना शहरातील गांधी चमन येथे आमरण उपोषणाला बसलेले समाजनेते दीपक रणनवरे यांनी अखेर आपले उपोषण मागे घेतले. भाजपचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी उपोषणस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन शासन आणि आंदोलक यांच्यात समन्वय साधल्याने या आंदोलनाची सांगता झाली. उपोषणाच्या सहाव्या दिवशी रणनवरे यांची प्रकृती



खालावल्याची माहिती मिळाल्यानंतर राम कुलकर्णी यांनी या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेतली. त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या निदर्शनास ब्राह्मण समाजाच्या मागण्यांचा विषय आणला. त्यानंतर कुलकर्णी यांनी स्वतः जालना येथे येऊन गांधी चमन येथील उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी कुलकर्णी यांनी दीपक रणनवरे यांच्याशी सविस्तर चर्चा करून (पान ३ वर)

## कै. विष्णू कोंडीबा वाघ यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण



बदनापूर / नवनाथ गव्हाणे : कै. विष्णू कोंडीबा वाघ, ढोकसाळकर शिक्षक, हल्ली मुक्काम फुलेनगर, बदनापूर यांचे दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यार्थ फुलेनगर, बदनापूर येथे वृक्षारोपण करण्यात आले. कै. वाघ यांनी शिक्षक म्हणून आपल्या कार्यकाळात विद्यार्थ्यांना ज्ञानदानासोबतच संस्कार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने त्यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, (पान ३ वर)

## जिल्ह्यात कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरांचे आयोजन

### ६२ महसूल मंडळांमध्ये १०, ११, १२, १५, १६ सप्टेंबर रोजी शिबिरांचे आयोजन

जालना/प्रतिनिधी : कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यात १० ते १७ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये एकूण ६२ शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये जालना तालुक्यात १० शिबिर तर बदनापूर मध्ये ६, अंबड मध्ये ९, घनसावंगी मध्ये ८,




परतूर मध्ये ६, मंठा मध्ये ६, भोकरदन मध्ये ११ आणि जाफराबाद मध्ये ६ असे एकूण ६२ शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८ तालुक्यांमधील ६२ महसूल मंडळांमध्ये दि.१०, ११, १२, १५ व १६ सप्टेंबर २०२६ रोजी या शिबिरांचे (पान ३ वर)

# संपादकीय

## शब्द व्युत्पत्ती स्थितीची ओळख

आज महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली. तरीही सर्वोच्च नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचताना अद्यापही अनेक अदृश्य अडथळे उभे राहतात. संधीची समानता, गुणवत्तेचा सन्मान आणि निर्णय घेणाऱ्यांची मानसिकता या तीन गोष्टींची खरी परीक्षा याच टप्प्यावर होते. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांच्या अलीकडील वक्तव्याने हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. महिलांना संधी मिळवण्यासाठी अजूनही लढावंच लागतं? या प्रश्नाचं उत्तर शोधताना सुधा मूर्ती यांच्या आयुष्यातील एक प्रसंग आपल्याला सांगून जातो की, शर्यत महिलांच्या क्षमतेची नसून त्यांना समान संधी देणाऱ्या समाजाच्या मानसिकतेची आहे आणि ती शर्यत अजून संपलेली नाही. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात माजी अमेरिकन परराष्ट्रमंत्री कॉन्डोलीझ्झा रईस यांच्याशी संवाद साधताना असे वक्तव्य केले की, मी अमेरिकेबाहेरील कोणत्याही देशात, भारतातसुद्धा, सीईओ होऊ शकले नसते. कारण अमेरिकेची व्यवस्था गुणवत्तेला प्राधान्य देते. येथे मार्गदर्शक तुम्ही पुरुष आहात की महिला, तुमची जात, वंश किंवा पार्श्वभूमी काय आहे, यापेक्षा तुमच्यातील गुणवत्ता आणि क्षमता महत्त्वाची मानतात. या वक्तव्यानंतर भारतात मोठी चर्चा रंगली. काहींनी नूयी यांच्या मताशी सहमती दर्शवत भारतात अजूनही महिलांना सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचताना अनेक संरचनात्मक अडथळ्यांना सामोरं जावं लागतं, असे म्हटले, तर अनेकांनी त्यांच्या विधानावर टीका करत भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांसाठी वाढलेल्या संधींकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे मत व्यक्त केले. दुसरी गोष्ट भारतात जिथे महिला काम करतात तिथले वरिष्ठ महिलांविषयी काय विचार करतात किंवा त्यांचं मत काय असू शकतं हे देखील महत्त्वाचे आहे. या एकूणच पार्श्वभूमीवर मला एक किस्सा आठवतो. महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, देशातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही. हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी.साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. अमेरिकेनं मला जी संधी दिली ती मला भारतातही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सूधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही. महिलांचे नेतृत्व, शिक्षण आणि करिअरविषयी आणि त्यांच्या पदाविषयी बोलायचे तर टॉप-५०० कंपन्यांमध्ये केवळ ०.४ टक्के महिला सीईओ असल्याचे समोर आलंय. या पार्श्वभूमीवर सुधा मूर्ती यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, महिलांना शिक्षण, कौशल्यविकास आणि करिअरमध्ये पुरुषांप्रमाणे समान संधी मिळाल्या पाहिजेत. मात्र, केवळ महिला असल्यामुळे कोणालाही पद मिळू नये हे मान्य नाही. नेतृत्वाच्या संधी पात्रता, मेहनत आणि गुणवत्तेच्या आधारावर मिळायला हव्यात. आर्थिक स्वातंत्र्यामुळे आज महिलांचा आत्मविश्वास वाढला आणि नेतृत्वाच्या संधीही विस्तारत आहेत. पण हे देखील इतकच खरं की कुटुंबातील जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि कार्यस्थळावरील अडचणी यामुळे अनेक महिला करिअरच्या मधल्या टप्प्यात मागे पडतात, याकडेही आपण लक्ष वेधायला हवं. कंपन्यांनी महिलांना टिकून राहता येईल, प्रगती करता येईल आणि नेतृत्वाच्या भूमिका स्वीकारता येतील, असे सकारात्मक आणि समावेशक कार्यपरिसर निर्माण करणे गरजेचे आहे. नूयी यांच्या वक्तव्यानंतर भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रात लिंगवैविध्य आणि महिलांच्या नेतृत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. बोर्डरूममध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याचे चित्र दिसत असले, तरी सर्वोच्च निर्णयक्षम पदांवर महिलांची उपस्थिती अत्यंत कमी असल्याचे समोर आले. ही परिस्थिती दर्शवते की महिलांना बोर्डमध्ये स्थान मिळत असले, तरी सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रवास अजूनही कठीण आहे. भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या प्रतिनिधित्वावर नव्याने चर्चा सुरू झाली. भारतात अनेक यशस्वी महिला उद्योगनेत्या घडल्या असल्या, तरी त्या अपवादात्मक उदाहरणे असल्याचे वास्तव आकडेवारी स्पष्ट करते. फॉर्च्यून कंपन्यांच्या आढाव्यातून स्पष्ट झाले, की देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या महिला असतानाही नेतृत्वाच्या सर्वोच्च पदांवर त्यांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. कंपनी कायदा २०13 अंतर्गत प्रत्येक पात्र कंपनीने किमान एक महिला स्वतंत्र संचालक नियुक्त करणे बंधनकारक करण्यात आले. या निर्णयाचा सकारात्मक परिणाम दिसून आला. सीएफए इन्स्टिट्यूट इंडियाच्या माहितीनुसार बोर्डवरील महिलांचे प्रतिनिधित्व सुमारे १९ टक्क्यांपर्यंत पोहोचले. मात्र, या क्षेत्रात अजूनही मोठी दरी आहे. ४१ कंपन्यांमध्ये अजूनही एकही महिला स्वतंत्र संचालक नाही. २१६ कंपन्यांमध्ये केवळ नियमापुरती एक महिला संचालक आहे. तज्ज्ञांच्या मते, मुख्य समस्या बोर्डरूममध्ये नसून मध्यम आणि वरिष्ठ व्यवस्थापनाच्या स्तरावर आहे. महिलांना करिअरमध्ये टिकून राहण्यासाठी, नेतृत्व विकसित करण्यासाठी आणि समान संधी मिळण्यासाठी संस्थात्मक पातळीवर सक्षम धोरणे राबविणे अधिक आवश्यक आहे. माजी नेस्ले इंडिया व्यवस्थापकीय संचालक सुरेश नारायणन यांच्या मते, केवळ कोट्यावर आधारित नियुक्त्यांपेक्षा गुणवत्तेवर निवड प्रक्रियेला प्राधान्य दिले पाहिजे. कंपन्यांनी अशी कार्यसंस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे, जिथे महिलांना नेतृत्वाच्या संधी नैसर्गिकरीत्या उपलब्ध होतील. कॉर्पोरेट भारताने बोर्डरूममध्ये महिलांसाठी दारे उघडली असली, तरी सीईओ आणि एमडीसारख्या सर्वोच्च पदांपर्यंत महिलांची संख्या वाढविण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.

# ज्ञानाची ज्योत तेवत ठेवणारे गुरू




गुरु म्हणजे केवळ ज्ञान देणारी व्यक्ती नव्हे, तर अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाणारा मार्गदर्शक. आपल्या जीवनात आई-वडिलांनंतर सर्वाधिक महत्त्वाचे स्थान शिक्षकांना दिले जाते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे आणि त्यांना जीवनाची योग्य दिशा दाखविण्याचे महान कार्य शिक्षक करतात. म्हणूनच शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो.

भारताचे महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि देशाचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी झाला. त्यांच्या जन्मदिनी भारतात शिक्षक दिन साजरा केला जातो. डॉ. राधाकृष्णन हे स्वतः एक आदर्श शिक्षक होते. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाचा सन्मान म्हणून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू झाली.

शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर त्यांना जीवनातील चांगले-वाईट समजून घेण्याची दृष्टी देतात. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या चुका समजावून सांगणे, अडचणीच्या काळात योग्य मार्गदर्शन करणे आणि आत्मविश्वास निर्माण करणे, हे शिक्षकांचे महत्त्वाचे कार्य आहे. त्यामुळे शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा आधारस्तंभ असतो.

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाच्या पद्धती बदलत आहेत. मोबाईल, इंटरनेट, संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या साधनांमुळे माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे शहाणपणात रूपांतर करण्याचे काम शिक्षकच करतात. विद्यार्थ्यांनी कोणती माहिती स्वीकारावी, तिचा योग्य उपयोग कसा करावा आणि समाजाप्रती आपली जबाबदारी काय आहे, हे शिक्षक शिकवतात.

शिक्षक दिनाच्या दिवशी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विद्यार्थी आपल्या शिक्षकांना शुभेच्छा देतात, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करतात आणि त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. अनेक ठिकाणी विद्यार्थी शिक्षकांची भूमिका स्वीकारून वर्गात अध्यापनही करतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्याची आणि जबाबदारीची प्रत्यक्ष अनुभूती मिळते.

एक चांगला शिक्षक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात कायमस्वरूपी छाप सोडतो. शिक्षकांनी दिलेले संस्कार, शिकवलेले धडे आणि केलेले मार्गदर्शन आयुष्यभर विद्यार्थ्यांसोबत राहते. डॉक्टर, अभियंता, शास्त्रज्ञ, अधिकारी, उद्योजक, कलाकार किंवा समाजसेवक होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या यशामागे कुठेतरी शिक्षकांचे मार्गदर्शन असते.

आजच्या काळात विद्यार्थ्यांनीही शिक्षकांच्या परिश्रमांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. शिक्षकांचा आदर करणे, त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाचे पालन करणे, मन लावून अभ्यास करणे आणि चांगला नागरिक बनण्याचा प्रयत्न करणे, हीच शिक्षकांना खरी आदरांजली ठरू शकते.

शिक्षक म्हणजे समाज घडविणारा शिल्पकार आहे. त्यांच्या हातून घडणारे विद्यार्थीच उद्याचा समाज आणि देश घडवतात. त्यामुळे शिक्षकांचे स्थान केवळ शाळेच्या वर्गखोलीपुरते मर्यादित नसून ते राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे आहे.

शिक्षक स्वतः जळून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश निर्माण करतो. म्हणूनच शिक्षक दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून आपल्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या प्रत्येक शिक्षकाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. शिक्षकांच्या ज्ञानाची आणि संस्कारांची ज्योत अशीच तेवत राहो आणि त्यांच्या मार्गदर्शनातून देशाला सुजाण, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक मिळोत, हीच शिक्षक दिनानिमित्त मनापासून शुभेच्छा.

# मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची तात्काळ दखल घ्या

## मराठा समाजाच्या न्याय्य मागण्या मान्य करा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ. बबनराव लोणीकर यांची मागणी



परतूर, प्रतिनिधी : मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध न्याय्य मागण्यांसाठी अंतरवली सराटी येथे आमरण उपोषणास बसलेले मराठा संघर्षयोद्धा मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्या उपोषणाची राज्य सरकारने तात्काळ व गांभीर्याने दखल घ्यावी, तसेच मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक व ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यांसाठी अंतरवली सराटी येथे आमरण उपोषण करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता निर्माण झाली असून परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण मराठा समाजामध्ये तीव्र अस्वस्थता असल्याचे आ. लोणीकर यांनी पत्रात नमूद केले आहे. मराठा समाजाच्या मागण्यांमध्ये ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे पात्र बांधवांना कुणबी प्रमाणपत्र देणे, संबंधित गॅझेट नोंदींची अंमलबजावणी करणे, आंदोलनातील गुन्हे मागे घेणे, आंदोलनात बलिदान दिलेल्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व शासकीय नोकरी देणे आदी मागण्यांचा समावेश असल्याचे पत्रात म्हटले आहे. यासोबतच सारथीच्या शिष्यवृत्ती व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्जावरील व्याज परताव्याचे प्रश्न मार्गी लावावेत, डएइउ व एइउ प्रवर्गातील पात्र उमेदवारांना नियुक्तिपत्रे द्यावीत, तसेच मराठा व कुणबी समाजाच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था निर्माण करावी, अशा प्रमुख मागण्यांवर सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आ. लोणीकर यांनी केली आहे. परतूर-मंठ्यातील कुणबी प्रमाणपत्रांची प्रकरणे निकाली काढा परतूर-मंठा तालुक्यासह जालना जिल्ह्यातील तहसील आणि उपविभागीय कार्यालयांमध्ये प्रलंबित असलेल्या कुणबी नोंदी व प्रमाणपत्रांच्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करून पात्र नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रे निर्गमित करावीत, अशी विशेष मागणीही आ. लोणीकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक आणि ठोस निर्णय घ्यावा, अशी विनंती परतूर-मंठा मतदारसंघातील जनतेच्या वतीने करण्यात येत असल्याचे आ. बबनराव लोणीकर यांनी पत्रात म्हटले आहे.

## भारताची फॉरेन्सिक मदत

नवी दिल्ली : नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरातील पीडितांची ओळख पटवण्याची प्रक्रिया जलद आणि सुलभ करण्यासाठी भारताने मोठे पाऊल उचलले आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार, या आपत्तीत बेपत्ता झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांसाठी भारतातील केंद्रीय आणि राज्यस्तरीय फॉरेन्सिक प्रयोगशाळांमध्ये डीएनए प्रोफाइलिंगची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. आपत्तीच्या या कठीण काळात भारत सरकारचा हा निर्णय पीडित कुटुंबीयांना आपल्या बेपत्ता नातेवाईकांचा शोध घेण्यास आणि त्यांची ओळख पटवण्यास मोठी मदत ठरणार आहे. भारतात राहणाऱ्या बेपत्ता व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकांना या विशेष सुविधेचा लाभ घेता येणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, बेपत्ता व्यक्तीचे आई-वडील, मुलगा-मुलगी किंवा भाऊ-बहीण स्वतःचे जैविक नमुने देऊन डीएनए प्रोफाइल तयार करून घेऊ शकतात.ही तपासणी केंद्रीय फॉरेन्सिक विज्ञान प्रयोगशाळा, राज्य फॉरेन्सिक विज्ञान प्रयोगशाळा, राष्ट्रीय फॉरेन्सिक विज्ञान विद्यापीठ तसेच डीएनए प्रोफाइलिंगची सुविधा असलेल्या छ-इङ-मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये केली जाणार आहे. नेपाळ-तिबेट सीमेजवळ बर्फ आणि खडकांचे मोठ्या प्रमाणात घसरण झाल्यामुळे आलेल्या या अचानक पुरामुळे उत्तर आणि मध्य नेपाळमधील अनेक गावे आणि शहरांचे मोठे नुकसान झाले आहे. नेपाळी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाधित भागांतून आतापर्यंत किमान १,२९० मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मदत आणि बचाव पथके सातत्याने घटनास्थळी कार्यरत असून, आतापर्यंत १२,००० हून अधिक लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. मात्र, परिस्थिती अद्याप गंभीर असून सुमारे ५,००० जण बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या शोधासाठी बचावकार्य सुरू आहे. काठमांडू येथील भारतीय दूतावासाने २६ ऑगस्ट रोजी आलेल्या या पुरातील पीडितांची ओळख पटवण्यासंदर्भातील आवश्यक प्रक्रिया आणि माहिती यापूर्वीच जारी केली होती. त्याचाच पुढील टप्पा म्हणून केंद्रीय गृह मंत्रालयाने भारतातील फॉरेन्सिक प्रयोगशाळांची सेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

### दहीहंडी ..

दही हंडी सु संपन्न
केला किती कल्ला
पहावे कसा भेदला
एकमेकाचाकिल्ला

उत्साहाचे थर उंची
थर थर करे जिल्हा
नवा जोश भरलेला
खूष गल्लीमोहल्ला

घोषणांचे डेसिबल
गाठला नवा पल्ला
विरोधक सत्ताधारी
एकदुज्यावर हल्ला

व्यापारी खुशभलते
अजून मोजा गल्ला
गोविंदाच्या कमरेचा
काटा झाला ढिल्ला

सेलिब्रिटी चांदीधुंदी
गच्च भरलायं थैला
उत्सवा सामील ना
असा विरळा नल्ला

राजकारणी भांडले
करी चिल्लमचिल्ला
प्रसिद्धीला आलेला
सजला नवीन दुल्हा

बाहेरचे रे पुरे झाले
पेटवा घरचा चुल्हा
खरा गोपाळ काला
सांगा कुणी खाल्ला

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

### शिक्षक ..

शिक्षकवीणशून्यवत
नीत माझापाठीराखा
परीस तो लोखंड मी
दुजा ना तया सारखा

सर्व नाते एका जागी
मातापिता बंधु सखा
बाकी नाती तात्पुरती
तोचि केवळ सख्खा

तयादुजे नको काही
भाव भक्ती प्रेमभुका
कानजरा पिरगाळून
पोटात घालतो चुका

ईश्वराचा अवतार तो
हार अमोल नवलखा
तुझे आहे तुझ्यापाशी
का हिंडत फिरे मुर्खा

ज्ञानप्राप्त शांती लुप्त
त्याचे स्नेहाले पारखा
वसता गुरू रे अंतरात
का दिशा दाही हुडका

प्रशिक्षक कोटी गुणी
थोडेफार काहीशिका
गुरू कल्प आम्र वृक्ष
रे रसदार फळे चाखा

कसा कसा मी नवखा
रे अंतर्मनास ओळखा
मुक्त हो अरिफासातून
दूर दुर्गुणांचा विळखा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# दहीहंडी हा गोकुळाष्टमी म्हणजेच कृष्णजन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जाणारा एक अत्यंत लोकप्रिय आणि उत्साही उत्सव आहे

(दहीहंडी) हा गोकुळाष्टमी म्हणजेच कृष्णजन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जाणारा एक अत्यंत लोकप्रिय आणि उत्साही उत्सव आहे. हा सण प्रामुख्याने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांचे स्मरण म्हणून या उत्सवाची परंपरा सुरू झाली. येथे दहीहंडीवर आधारित एक सुंदर आणि सोपा निबंध (लेख) दिला आहे:

**दहीहंडी: उत्साहाचा आणि एकतेचा सण प्रस्तावना**

दहीहंडी हा सण संपूर्ण भारतात, विशेषतः महाराष्ट्रात अतिशय उत्साहाने साजरा केला जातो. श्रावण महिन्यातील वद्य अष्टमीला श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा झाल्यानंतर, नवमीच्या दिवशी दहीहंडीचा थरार पाहायला मिळतो. हा केवळ एक धार्मिक सण नसून तो क्रीडा, संस्कृती आणि सामूहिक एकतेचे प्रतीक बनला आहे.

**धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व**

या सणाची पार्श्वभूमी भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांशी जोडलेली आहे. बालपणी श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसोबत (गोपाळांसोबत) मिळून गोकुळातील घराघरांमध्ये जाऊन दही, दूध आणि लोणी चोरायचे. गोपी आपल्या घरातील लोण्याचे माठ उंचावर टांगून ठेवायच्या, जेणेकरून बाळकृष्णाचा हात तिथे पोहोचणार नाही. परंतु, चतुर श्रीकृष्ण आपल्या मित्रांचे मानवी मनोरे (र्कीरप झ्रीराळवी) रचून त्या उंचावरील हंडीपर्यंत पोहोचायचे आणि लोणी फस्त करायचे. याच बाललीलेची आठवण म्हणून आज दहीहंडी साजरी केली जाते.

साजरी करण्याची पद्धत

दहीहंडीच्या दिवशी चौकाचौकात, रस्त्यांवर उंचावर दही, दुध, लोणी, फळे आणि फुलांनी सजवलेली मातीची हंडी टांगली जाते. 'गोविंदा पथक' म्हणून ओळखले जाणारे तरुणांचे गट या हंड्या फोडण्यासाठी एकत्र येतात.

✻ गोविंदा ढोल-ताशांच्या गजर आणि गोविंदा आला रे आला, गोकुळात आनंद झाला अशा घोषणा देत मानवी मनोरे रचतात. ✻ सर्वात वरचा गोविंदा (ज्याला सहसा बाल-गोविंदा म्हटले जाते) हंडीपर्यंत पोहोचून ती फोडतो.

✻ हंडी फुटताच आजूबाजूचे लोक गोविंदांवर पाण्याचा वर्षाव करतात, ज्यामुळे वातावरणातील उत्साह अधिकच वाढतो. एकता आणि क्रीडा प्रकार

आधुनिक काळात दहीहंडीला एका साहसी खेळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या सणातून आपल्याला खालील गोष्टी शिकायला मिळतात: ✻ सांघिक भावना (ढशरीुेीज्ञ): मनोरा रचताना प्रत्येक गोविंदाचा एकमेकांवर विश्वास असणे गरजेचे असते.

✻ नियोजन आणि शिस्त: एक लहानशी चूकही मनोरा कोसळण्यास कारणीभूत ठरू शकते, त्यामुळे यात कमालीची शिस्त लागते.

✻ समानता: यात जात, पात, धर्म विसरून सर्व तरुण एकत्र येतात. समारोप

आजकाल दहीहंडी उत्सवाला व्यावसायिक स्वरूप आले असून लाखो रुपयांची बक्षिसे ठेवली जातात. मात्र, हे करत असताना गोविंदांच्या सुरक्षेची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. नियमांचे पालन करून आणि सुरक्षिततेची साधने वापरून हा सण साजरा केला पाहिजे. दहीहंडी हा सण आपल्याला जीवनात एकजुटीने काम करण्याचा आणि संकटांवर मात करून ध्येयापर्यंत पोहोचण्याचा संदेश देतो.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# चर्चगेट ते मुंबई सेंट्रल दरम्यान रविवारी जम्बो ब्लॉक

मुंबई/वृत्तसेवा : रेल्वे रूळ, सिग्नल यंत्रणा आणि ओव्हरहेड उपकरणांच्या देखभालीसाठी पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय विभागात रविवार, ६ सप्टेंबर रोजी चर्चगेट आणि मुंबई सेंट्रल स्थानकांदरम्यान जम्बो ब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी १०:३५ ते दुपारी ३:३५ वाजेपर्यंत म्हणजेच पाच तासांचा जम्बो ब्लॉक असेल. या ब्लॉकदरम्यान जलद मार्गावरील सर्व लोकल गाड्या चर्चगेट आणि मुंबई सेंट्रल स्थानकांदरम्यान धिम्या



मार्गावरून चालवल्या जातील. या ब्लॉकमुळे काही अप आणि डाऊन उपनगरीय फेऱ्या रद्द राहतील, तर चर्चगेटच्या दिशेने जाणाऱ्या काही गाड्या वाड्रा किंवा दादर स्थानकावर शॉर्ट टर्मिनेट करून परत पाठवल्या जातील. प्रभावित होणाऱ्या लोकल गाड्यांची सविस्तर यादी संबंधित उपनगरीय स्थानकांच्या स्टेशन मास्टरांकडे उपलब्ध असेल. प्रवाशांनी या बदलांची नोंद घ्यावी आणि त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे

# पीक विम्यावर सवाल केला अन् खासदारांचा पारा चढला!

## प्रा.पंढरी पाठे यांना धक्काबुक्की; शेतकरी चळवळीचा संताप

यवतमाळ। दि.४ सप्टेंबर २०२६ : यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांची आज शासकीय विश्रामगृह,यवतमाळ येथे शेतकरी चळवळीचे प्रतिनिधी प्रा.पंढरी पाठे व सचिन मनवर यांनी भेट घेतली.यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा ज्वलंत असलेला पीक विम्याचा प्रश्न खासदारांसमोर मांडण्यासाठी गेलेल्या प्रतिनिधींना यावेळी धक्काबुक्की करण्यात आली तसेच अरेरावीची भाषा वापरण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या पीक विम्याबाबत प्रश्न विचारला असता,मी माझं पाहून घेईल,तुला काय घेणं-देणं? अशा स्वरूपाची भाषा वापरण्यात आल्याचा आरोप शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी केला.तसेच खासदारांच्या कार्यकर्त्यांनी सामान्य कार्यकर्त्यांच्या अंगावर येत धक्काबुक्की केल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी निवडून दिलेल्या खासदारांना शेतकऱ्यांनी प्रश्न विचारायचे नाहीत का? असा संतप्त सवाल यावेळी




उपस्थित करण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासोबत असताना शेतकऱ्यांच्या व जनतेच्या प्रश्नांसाठी भूमिका मांडणारे संजय देशमुख यांनी विकासासाठी पक्ष बदलल्याचे सांगितले.मात्र,पीक विम्यासारख्या गंभीर शेतकरी प्रश्नावर प्रश्न विचारताच अरेरावी आणि हुज्जतबाजी होत असेल,तर हा नेमका कोणता विकास? असा सवाल शेतकरी चळवळीच्या प्रतिनिधींनी केला. ही कुठली लोकशाही? हा तर हुकूमशाहीचा प्रकार आहे.पैशाचा माज आला म्हणून जनतेने प्रश्न विचारायचे नाहीत का? असा संताप व्यक्त करत शेतकरी चळवळीच्या वतीने खासदार संजय देशमुख यांच्या वर्तनाचा निषेध करण्यात आला. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीक विम्याचा प्रश्न तातडीने सोडवावा,अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

**- शेतकरी चळवळ,यवतमाळ ग्रामीण.**

# इस्रायलमध्ये रोजगारासाठी महाराष्ट्रातील ६० बांधकाम कामगारांची पहिली तुकडी होणार रवाना

मुंबई : इस्रायलमध्ये रोजगारासाठी महाराष्ट्रातील १०३ बांधकाम कामगारांपैकी ६० जणांची पहिली तुकडी ३ सप्टेंबर रोजी रवाना होत आहे.आगामी कालावधीत टप्प्याटप्प्याने कामगार रवाना होतील. इस्रायलमध्ये रोजगारासाठी जाणाऱ्या युवकांनी कठोर परिश्रम करून आपल्या कुटुंबासह महाराष्ट्राचा आणि देशाचा नावलौकिक वाढवावा. भारतीय संस्कृतीचा आदर राखत शिस्त, प्रामाणिकपणा आणि व्यावसायिकता जपावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राच्या विकासात हा निर्णय अत्यंत महत्वाचा आहे असे मत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे 'महाराष्ट्राची कौशल्यशक्ती आता जगभर' या कार्यक्रमांतर्गत इस्रायलमध्ये रोजगारासाठी निवड झालेल्या व ३ सप्टेंबर रोजी रवाना होणाऱ्या महाराष्ट्रातील कुशल बांधकाम कामगारांशी कौशल्य विकास मंत्री लोढा यांनी संवाद साधला. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एनएसडीसी) आणि एनएसडीसी इंटरनॅशनल यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यावेळी मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तथा मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे आयुक्त अमित सैनी, सह-मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे अवर सचिव चंद्रहंस राठोड, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एनएसडीसी) आणि एनएसडीसी इंटरनॅशनलचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत सिंन्हा, चंद्रहास राठोड, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळाचे संचालक योगेश पाटील, महाराष्ट्र राज्य कौशल्य सोसायटीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माळी यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात 'विकसित भारत' आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'विकसित महाराष्ट्र' संकल्पनेच्या पूर्ततेत कौशल्य विकास क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. या उपक्रमात 'मित्रा' संस्थेने नावाप्रमाणेच कामातूनही युवकांचा खरा मित्र म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इस्रायलमध्ये युवकांना दरमहा सुमारे दोन लाख रुपये वेतन, वैद्यकीय सुविधा तसेच शासकीय स्तरावरील सुरक्षित रोजगाराची हमी मिळणार आहे. आयटीआयमधील प्रशिक्षणासोबतच इस्रायलमधील रोजगारासाठी आवश्यक विशेष प्रशिक्षणही राज्य शासनाने दिल्यामुळे हे युवक रोजगारासाठी पूर्णपणे सक्षम झाले आहेत. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभांतर्गत येत्या २९



सप्टेंबर रोजी राज्यभरातील एक हजार ठिकाणी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. इस्रायलमध्ये रोजगारासाठी जाणाऱ्या सर्व युवकांना मंत्री लोढा यांनी भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तरुणांना उद्योगाभिमुख कौशल्ये दिल्यामुळे आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी - केंद्रीय कौशल्य विकास मंत्री जयंत चौधरी केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता, शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे इस्रायलमध्ये रोजगारासाठी महाराष्ट्रातील १०३ बांधकाम कामगारांची पहिली तुकडी ३ सप्टेंबर रोजी रवाना होत आहे याबद्दल अभिनंदन केले. इस्रायलमध्ये कुशल बांधकाम कामगारांची मोठी मागणी असून त्यांनी आपल्या तरुणांसाठी नवे मार्ग खुले केले आहेत. एनएसडीसी, इस्रायलचे लोकसंख्या आणि स्थलांतर प्राधिकरण आणि विविध राज्य शासनांच्या सहकार्याने आतापर्यंत ६,७०० हून अधिक भारतीय कामगार यशस्वीरित्या तेथे पाठवण्यात आले आहेत. आपल्या तरुणांना उद्योगाभिमुख कौशल्ये देऊन त्यांना आंतरराष्ट्रीय संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे मत व्यक्त केले. महाराष्ट्रातील कुशल बांधकाम कामगारांना इस्रायलमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध महाराष्ट्रातील कुशल बांधकाम कामगारांना इस्रायलमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी भारत व इस्रायल सरकारच्या समन्वयाने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत बांधकाम क्षेत्रातील गिलावा काम (प्लास्टरिंग), सिरेमिक फरशी बसविणे (सिरेमिक टायलिंग), इमारतींचे सांगाडे/फ्रेमवर्क तयार करणे आणि लोखंड वाकविणे (आयर्न बेंडिंग) या चार व्यवसायांतील कामगारांची निवड करण्यात आली आहे.या उपक्रमासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणीकृत सुमारे ४ लाख कामगारांची छाननी करण्यात आली. १२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून खुल्या कॅम्पस भरतीद्वारे उमेदवारांपर्यंत पोहोचण्यात आले. तसेच ३ लाखांहून अधिक कामगारांशी दूरध्वनी व लघुसंदेश द्वारे संपर्क साधण्यात आला. त्यानंतर ९९७ उमेदवार निवडले गेले. वैद्यकीय तपासणी, पोलीस पडताळणी आणि इस्रायली नाव पडताळणी प्रक्रियेनंतर ७८३ उमेदवारांना अंतिम मान्यता मिळाली. या उमेदवारांचे टप्प्याटप्प्याने इस्रायलमध्ये रोजगारासाठी प्रस्थान नियोजित आहे. इस्रायली प्रशिक्षक यांनी २२ ते २५ जुलै २०२६ दरम्यान प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम घेतला. त्यानंतर १०३ उमेदवारांनी इस्रायली मानकांनुसार रिफ्रेशर प्रशिक्षण पूर्ण केले. १०३ कामगारांपैकी ६० कामगारांची पहिली तुकडी ३ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबईहून इस्रायलकरिता रवाना होणार आहे. सदर कामगार तेल अवीव येथे काम करणार आहेत. यावेळी बांधकाम कामगारांना त्यांच्या प्रस्थानपूर्व मार्गदर्शन प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रवासाची कागदपत्रे, आवश्यक माहिती तसेच व्हिसा व विमान तिकिटांचे वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तथा मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे आयुक्त अमित सैनी, सह-मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांनी या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

## झाडे लावा झाडे जगवा पाणी आडवा पाणी जिरवा

### शिळा ..

कारागृह असूरी दिसे
भयाण काळोखीरात्र
धारा कोसळी धडाडा
शहारते गा गात्र गात्र

कंसटपला मारायला
जनता देवकीला पुत्र
जीव घेतला कोवळा
कान्हा समजूनि मात्र

खेळ खेळली नियती
प्रज्वलीत अग्नी होत्र
जन्मला देवकीनंदन
त्राता जगताचा मित्र

तुटल्या दुःख शृंखला
बदलूनि गेले ते चित्र
सरली काळोखी रात्र
बदलले नव युग सूत्र

गेली अभद्र जळमटे
जुळली नाती पवित्र
नायक महाभारताचा
व्यासे रेखाटले चरित्र

बा संभवामि युगे युगे
वाट पाहिली अहोरात्र
अवतरला जगत् त्राता
सुखावे मनु प्राणीमात्र

कंस जाचा कंटाळल्या
प्रजेले लाभले महाछत्र
महाभारता महा नायक
लज्जेलापांघरेमहावस्त्र

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### गोकुळ ग्वाला ..

कळले ना माझ्यात
अहम् कुठून आला
कळले कित्येकवर्षे
तो इथे वास्तव्याला

एकटा नसे अहंकार
चिक्कार मित्रत्याला
कुणाच्याधमक्याला
कधीचं नाही भ्याला

सततकरतो अनादर
कदर कोळून प्याला
लर्जी होअमृताची
रिचवतो विष प्याला

राक्षसी वृत्ती बळावी
असूया हवस सबला
विसरु गेलो स्वताला
होतो मी माणूसभला

सत्संग नावडे मुळीचं
गुन्हेजंजाळात रमला
सरणा पेटवून ज्वाला
चिंतेच्या चिते भ्रमला

हरिनाम कानी पडता
चमत्कार काय झाला
अंतर्मनात दिपोत्सव
हसला गोकुळ ग्वाला

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

पान १ व ४ वरुन

### भाजप प्रदेश प्रवक्ते राम

त्यांच्या मागण्या शासनाच्या संबंधित विभागांपर्यंत प्रभावीपणे मांडण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. शासनाचे प्रतिनिधी म्हणून निवासी जिल्हाधिकारी श्री. रामदास दौंड , पोलिस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी, तहसीलदार धैर्यशील गवळी उपस्थित होते. त्यांनी रणनवरे यांच्या मागण्या शासन दरबारी मांडण्याचे लेखी आश्वासन दिले. मुख्यमंत्र्यांसोबत लवकरच बैठक ब्राह्मण समाजाच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मुंबईत लवकरच बैठक आयोजित करण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले. शासन सकारात्मक भूमिका घेत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर रणनवरे यांनी आपले आमरण उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. दीपक रणनवरे यांनी उपोषणादरम्यान परशुराम आर्थिक विकास महामंडळाला पुरेसा निधी उपलब्ध करून देणे, महामंडळावर अशासकीय सदस्य व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, ईडब्ल्यूएस आरक्षणाची उत्पन्न मर्यादा वाढविणे तसेच विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे मोफत सुरू करणे आदी मागण्या शासनाकडे केल्या होत्या. गेल्या सहा दिवसांपासून अन्नत्याग केल्यामुळे रणनवरे यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला होता. त्यामुळे या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप होणे आवश्यक होते. राम कुलकर्णी यांनी केलेल्या मध्यस्थीमुळे शासनाचे प्रतिनिधी आणि आंदोलक यांच्यात सकारात्मक चर्चा झाली आणि आंदोलनाची कोंडी फुटली. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन दीपक रणनवरे यांनी आमरण उपोषण सोडल्याची घोषणा केली. यावेळी अंबाजोगाई पेशवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी प्रा. राहुल कुलकर्णी, डॉ महेश अकोलकर, योगेश जानतीकर ,संजय देशपांडे, मधुसूदन दंडारे , आर आर जोशी,अरविंद देशपांडे, दिलीप जोशी, ड बळवंत नाईक, भूषण जोशी, राहुल यादनिक , अनिल दीक्षित, सिद्धीविनायक मुळे, विलास कुलकर्णी, मंदार कुलकर्णी ,संतोष दानी यांच्यासह समाजातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. समाजाच्या मागण्या आंदोलनाच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे; मात्र संवाद आणि समन्वयातून त्यावर सकारात्मक तोडगा काढणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीत ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर निश्चितपणे सकारात्मक चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करू, असे यावेळी राम कुलकर्णी यांनी सांगितले.

### कै. विष्णू कोंडीबा

मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी कै. विष्णू कोंडीबा वाघ यांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### जिल्ह्यात कुणबी, कुणबी

आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये १० सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील देवमुर्ती आणि सांगवी तलाव या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील बदनापुर, अंबड तालुक्यातील अंबड, घनसावंगी तालुक्यातील कुंभारपिंपळगाव आणि राणी उंचेगाव, परतुर तालुक्यातील आष्टी, मंठा तालुक्यातील पांगरी गोसावी, भोकरदन तालुक्यातील आन्वा, दानापुर, पिंपळगाव रेणुकाई आणि जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथे शिबिरे होणार आहेत. तसेच ११ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील नेर आणि शेवली या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील बावणे पांगरी, अंबड तालुक्यातील शहागड आणि वडीगोद्री, घनसावंगी तालुक्यातील रांजणी आणि पानेवाडी, परतुर तालुक्यातील श्रीष्टी, मंठा तालुक्यातील तळणी ढोकसाळ, भोकरदन तालुक्यातील धावडा, भोकरदन आणि जाफ्राबाद तालुक्यातील कोळेगाव येथे शिबिरे होणार आहेत. १२ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील वाघुळ जहागीर आणि गोलापांगरी या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील रोशनगाव आणि शेलगाव, अंबड तालुक्यातील ताडहदगाव आणि गोंदी, घनसावंगी तालुक्यातील अंतरवाली टेंभी आणि जांब समर्थ, परतुर तालुक्यातील वाटुर, मंठा तालुक्यातील मंठा, भोकरदन तालुक्यातील राजुर, जानेफळ दाभाडी आणि जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे शिबिरे होणार आहेत. १५ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील रामनगर, विरेगाव, जालना या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील चिखली, अंबड तालुक्यातील सुखापुरी, रोहिलागड, घनसावंगी तालुक्यातील तिर्थपुरी, परतुर तालुक्यातील सातोना खुर्द, कोकाटे हदगाव मंठा तालुक्यातील माळतोंडी, भोकरदन तालुक्यातील हसनाबाद, आव्हाना आणि जाफ्राबाद तालुक्यातील जाफ्राबाद येथे शिबिरे होणार आहेत. तसेच १६ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील पाचनवडगाव या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील दाभाडी, अंबड तालुक्यातील जामखेड, धनगरपिंप्री, घनसावंगी तालुक्यातील घनसावंगी, परतुर तालुक्यातील परतुर मंठा तालुक्यातील जयपुर, भोकरदन तालुक्यातील केदारखेडा, सिपोरा बाजार आणि जाफ्राबाद तालुक्यातील कुंभारझरी, वरुड बु. या मंडळात शिबिरे होणार आहेत. या शिबिरांमध्ये नागरिकांना कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या नोंदी शोधणे, पुराव्यांची पडताळणी करणे, अर्ज स्वीकारणे आणि पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी आदेशान्वये कळविले आहे. विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पदार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### बैलपोळ्यानिमित्त परंपरेचे

सणाची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा छोट्या-छोट्या प्रयत्नांचे महत्त्व मोठे आहे. संस्कृतीसोबत कलेचेही जतन मातीपासून बैल तयार करणे ही केवळ उपजीविकेची कला नसून महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे. शेतकरी आणि बैल यांच्यातील नाते, शेती संस्कृती आणि निसर्गाप्रती कृतज्ञता या सर्व भावनांचे प्रतिबिंब बैलपोळा सणात पाहायला मिळते. मातीच्या बैलांच्या माध्यमातून या परंपरेचे प्रतीकात्मक जतन केले जाते. कुंभार समाजातील कारागीर आपल्या कौशल्यातून मातीला आकार देत बैलांच्या आकर्षक मूर्ती तयार करतात. त्यानंतर त्यावर रंगांची उधळण करून त्यांना सजवले जाते. या प्रक्रियेत चिमुकलींचाही सहभाग दिसून येत असल्याने परंपरागत कला आणि कौशल्याची पुढील पिढीकडे होणारी वाटचाल अधोरेखित होत आहे.

### आभासी चलन यामध्ये गुंतवणुक

बरोबर आरोपी विरुध्द इंचलकरंजी जिल्हा कोल्हापुर, ठाणे, ठाणे, राबोडी पोलीस ठाणे , बागलकोट कर्नाटक, या ठिकाणी गुन्हे नोंद असुन सर्वच आरोपी हे फरार होते पैकी, तांत्रीक विश्लेषना नुसार आर्थिक गुन्हे शाखा जालना यांनी यातील आरोपी नामे रमेश बाबुराव उत्तेकर रा. हरीओम पुरम सोसायटी औंधगाव पुणे यांची माहीती काढुन वरीष्ठांचे परवानगी घेऊन अहिल्यानगर जिल्हयात जाऊन संगमनेर तालुका पोलीस ठाणेची स्थानिक मदत घेऊन आरोपी नामे रमेश बाबुराव उत्तेकर वय ५४ वर्षे रा. प्लॉट क.२०२, हरीओम पुरम सोसायटी औंधगाव पुणे यास दि. ०३/०९/२०२६ रोजी पो.स्टे. संगमनेर हददीत आरोपीस अटक केली आहे. आरोपी हा व्यवसायाने वकील असुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल झाल्यापासुन तो नमुद गुन्हयात फरार होता त्यास गजाआड करण्यात पोलीसांना यश आले आहे. सदर आरोपीस मा. विशेष न्यायालय चझखऊ यांचे समक्ष हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपीस ०५ दिवस झउठ मंजुर केला आहे. गुन्हयाचा सखोल तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत आहे. सदरची कामगीरी ही मा.श्री.तेघबीरसिंह संधु पोलीस अधिक्षक जालना, डॉ. श्री.विक्रम साळी, अपर पोलीस अधिक्षक, श्री.बाळासाहेब पवार, उप विभागीय पोलीस अधिकारी, आर्थिक गुन्हे शाखा जालना यांचे मार्गदर्शनाखाली, श्री मिथुन घुगे, सहा पोलीस निरीक्षक, श्री शैलेष म्हस्के, पोलीस उप निरीक्षक, गोकुळसिंग कायटे, किरण चव्हाण, समाधान तेलंग्रे, अंबादास साबळे, विष्णु कोरडे, ज्ञानोबा खुणे, श्रेयश वाघमारे, महीला अंमलदार जयश्री निकम, मंदा नाटकर यांनी पार पाडली आहे.

### परतूरला शास्त्री

उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये एक वाचन पेटी ठेवण्यात येणार आहे. या पेटीत विविध लेखकांची पुस्तके ठेवण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी ही पुस्तके घरी घेऊन जावीत व वाचन करावे असे अपेक्षित आहे. हा उपक्रम महिनाभर राबविण्यात येणार आहे.

# जालना जिल्ह्यातील पाच शिक्षकांची जिल्हा स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड




जालना : शिक्षक क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने दरवर्षी शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर प्रदान करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जालना जिल्ह्यातील पाच शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे येथे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत जिल्हा निवड समितीने प्राप्त ३० शिक्षकांच्या प्रस्तावांची छाननी करून सन २०२६ च्या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी पाच शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १२ डिसेंबर २००० अन्वये शिक्षक क्षेत्रात उत्कृष्ट, उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी जिल्हा शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. त्यानुसार यंदाच्या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील पात्र शिक्षकांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त प्रस्तावांमधून जिल्हा निवड समितीने विविध निकषांच्या आधारे पाच शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली आहे.

जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांमध्ये श्री. कैलास मधुकर चौथे, प्राथमिक शिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, देवगाव म.कें., गेवराई बाजार, ता. बदनापूर, श्री. सचिन रामदास खिल्लारे, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, लालवाडी तांडा, ता. अंबड, श्री. विजय बाबाराव कांगणे, प्राथमिक पदवीधर शिक्षक, जि. प. उच्च प्राथमिक शाळा, दुधा, ता. मंठा, श्री. पेन्टू विठ्ठल मैसनवाड, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, दहिफळ भो., पूर्व, ता. परतूर तसेच डॉ. दत्तात्रय मनोहर सपकाळ, माध्यमिक शिक्षक, जि. प. प्रशाला, धावडा, ता. भोकरदन, यांचा समावेश आहे.

शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी केलेले प्रयत्न, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेले उपक्रम, नावीन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग तसेच समाजाभिमुख आणि उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेऊन शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली जाते. जिल्ह्यातील शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव व्हावा, या उद्देशाने हा पुरस्कार महत्त्वपूर्ण मानला जातो.

## बैलपोळ्यानिमित्त परंपरेचे जतन; चिमुकलीच्या हातून मातीच्या बैलांना रंगरंगोटी

### आई–वडिलांना हातभार लावत चिमुकलीचा उत्साह




छाया : नागेश बेनिवाल

जालना : महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीत बैलपोळा सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेतकऱ्याच्या जीवनात बैलांचे असलेले महत्त्व आणि त्यांच्या प्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण आजही मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील कुंभार गल्ली परिसरात एका चिमुकलीचा मातीचे बैल तयार करण्याचा आणि त्यांना रंगरंगोटी करण्याचा उत्साह लक्ष वेधून घेत आहे. शाळेत शिक्षण घेणारी ही चिमुकली आपल्या आई–वडिलांना हातभार लावण्यासाठी उत्साहाने मातीचे बैल तयार करण्याच्या कामात सहभागी झाली आहे. आई–वडील मातीपासून बैलांच्या मूर्ती तयार करत असताना त्यांना आकार देणे, रंगकामासाठी मदत करणे आणि तयार झालेल्या मातीच्या बैलांना आकर्षक रंग देण्याचे काम ही चिमुकली आनंदाने करताना दिसत आहे. बैलपोळा सण जवळ आला की कुंभार गल्ली परिसरात मातीच्या बैलांच्या मूर्ती तयार करण्याची लगबग सुरू होते. पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या या मातीच्या बैलांना विविध रंगांची रंगरंगोटी करून आकर्षक रूप दिले जाते. लाल, पिवळा, हिरवा, निळा यांसारख्या विविध रंगांचा वापर करून बैलांच्या मूर्ती सजवल्या जातात. या मूर्ती खरेदी करण्यासाठी नागरिकांचीही लगबग सुरू असते. चिमुकल्या हातांनी परंपरेला नवा रंग मोबाईल आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अनेक पारंपरिक कला आणि संस्कृतीच्या गोष्टी हळूहळू मागे पडताना दिसत आहेत. मात्र, या चिमुकलीने आपल्या आई–वडिलांसोबत मातीच्या बैलांना रंग देत परंपरागत कलेशी आपली नाळ जोडून ठेवली आहे. तिच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह आणि मातीच्या बैलांना रंग देताना दिसणारी तन्मयता नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. आई–वडिलांच्या व्यवसायाला हातभार लावत असतानाच ही चिमुकली आपल्या संस्कृतीची ओळखही जपत आहे.

बैलपोळा (पान ३ वर)

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करण्यासाठी ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ



जालना/प्रतिनिधी : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. शासकीय वसतिगृहातील इयत्ता ११ वी, इयत्ता १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी अर्ज करण्यासाठी ३० ऑक्टोबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. स्वाधार योजनेच्या लाभासाठी वसतिगृह प्रवेशाचा अर्ज आवश्यक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. स्वाधार योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी विहित मुदतीत अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी याची गांभीर्याने नोंद घेऊन ३० ऑक्टोबर, २०२६ पूर्वी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जालना जिल्ह्यातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांच्या मार्फत करण्यात आले आहे.

## रक्षाबंधनाचा अनोखा उपक्रम; चंदनझिरा पोलिसांनी महिला अंमलदारांना दिली हेल्मेटची भेट



जालना/प्रतिनिधी : नागरिकांच्या सुरक्षेसाठी दिवस–रात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांनी रक्षाबंधन सणानिमित्त सामाजिक बांधिलकी आणि सहकाऱ्यांप्रती असलेला जिव्हाळा जपत अनोखा उपक्रम राबविला. चंदनझिरा पोलीस ठाण्यातील महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सहकारी अधिकारी व अंमलदारांना राखी बांधली. त्याबदल्यात महिला अंमलदारांना हेल्मेट भेट देत त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेण्याचा संदेश देण्यात आला. चंदनझिरा पोलीस ठाण्यात दैनंदिन पोलीस कामकाज, विविध बंदोबस्त तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सांभाळत असतानाही रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. पोलीस ठाण्यातील १३ महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांनी अधिकारी व अंमलदारांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. पोलीस कर्मचारी वर्षभर नागरिकांच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावत असतात. सण–उत्सवाच्या काळातही बंदोबस्ताच्या माध्यमातून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी ते कार्यरत असतात. या उपक्रमामुळे पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांमधील आपुलकी आणि कुटुंबवत्सल नाते अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. राखी बांधली अन् बहिणींच्या सुरक्षिततेची जबाबदारीही घेतली पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. कर्तव्यावर असताना रस्ते अपघातात महिला अंमलदारांना गंभीर दुखापत झाल्याच्या घटना लक्षात घेऊन चंदनझिरा पोलीस ठाण्याने रक्षाबंधनाला सुरक्षिततेची जोड देण्याचा निर्णय घेतला. पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या संकल्पनेतून महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांना रिटर्न गिफ्ट म्हणून हेल्मेट भेट देण्यात आले. त्यामुळे रक्षाबंधनाचा हा सोहळा केवळ राखीपुरता मर्यादित न राहता सुरक्षिततेचा संदेश देणारा ठरला. दुचाकीवरून प्रवास करताना हेल्मेटचा वापर केल्यास अपघाताच्या प्रसंगी गंभीर दुखापतीचा धोका कमी होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करून हेल्मेटचा नियमित वापर करावा, असा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

**कर्तव्यनिष्ठ पोलीस दलात स्नेहाचा धागा**

कायदा–सुव्यवस्था, बंदोबस्त, आपत्कालीन परिस्थिती आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस अधिकारी व अंमलदारांना सतत तत्पर राहावे लागते. अशा धावपळीच्या कर्तव्यातही माणुसकीची नाती, स्नेह आणि परस्पर विश्वास जपणे महत्त्वाचे असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. चंदनझिरा पोलीस ठाण्यातील या अनोख्या रक्षाबंधन उपक्रमामुळे राखीचा स्नेह, कर्तव्यनिष्ठा आणि सुरक्षिततेची प्रेरणा यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

## आभासी चलन यामध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडुन आर्थिक फसवणुक करणारा व्यवसायाने वकील असलेला फरार आरोपी रमेश उत्तेकर गजाआड; पाच दिवसाचा पीसीआर मंजूर



जालना/प्रतिनिधी : जागतीक बाजारामध्ये बिट कॉईन व आभासी चलनाला दिल्या जाणाऱ्या महत्वामुळे नागरीकांचा अभासी चलना मध्ये गुंतवणुकीचा वाढणारा सहभाग लक्षात घेऊन प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेले आभासी चलक इडड्ड व तऊद्ध या मध्ये फार मोठया आर्थिक लाभाचे आमिष देऊन गुंतवणुकदारांना त्यामध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडले आणि मोठया प्रमाणावर गुंतवणुक करुन घेऊन नंतर पसार झालेल्या आरोपीच्या आर्थिक शाखा जालना यांनी आवळल्या मुसक्या. सविस्तर हकीगत अशी की, दिनांक १८/१०/२०२५ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी प्रमाणे अमोद वसंत म्हेतर, इरफान सय्यद मोयोददीन, व्यंकटेश दशरथ भोई रा. रा. इचलकरंजी कोल्हापुर, रमेश उत्तेकर रा. पुणे ता. जि. पुणे, अजय गायकवाड रा. कोल्हापुर ता. जि. कोल्हापुर, शर्वरी अमोद म्हेतर रा. इचलकरंजी कोल्हापुर यांनी वेळोवेळी खोटी आश्वासने देऊन फिर्यादी व त्यांचे नातलग आणि मित्र परीवारातील व्यक्तीची ४,३०,६६,७९५/– रुपये गुंतवणुक घेऊन त्यांचे नमुद रकमेचा अपहार केल्या संबंधी पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा रजिष्टर क्रमांक ४४१/२०२५ कलम ४२०,४०६,४०९,१२०(ब) भादंवि सह ३,४,५ चझखऊ कायदया प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. वरील आरोपी विरुध्द या पुर्वी पोलीस ठाणे तालुका जालना येथे ऋऊउउ (क्रिप्टो करंन्सी) या प्रकरणात गुन्हा नोंद होता त्यामध्ये वरील सर्व आरोपी अटक होते याच (पान ३ वर)

## परतूरला शास्त्री विद्यालयात वाचन पेटी उपक्रमास प्रारंभ लॉयन्स क्लबचा उपक्रम



परतूर/प्रतिनिधी : येथील छत्रपती शिवाजीनगरमधील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शुक्रवारी (दि. ४) लॉयन्स क्लबच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या वाचन पेटी उपक्रमाचा शुभारंभ मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी लॉ. गुणवंत पिंपळे, प्रमोद टेकाळे, नरपत जांगीड यांचीही उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी, त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडावी या प्रमुख उद्देशाने येथील लॉयन्स क्लबच्या वतीने वाचन पेटी हा महत्वाकांक्षी (पान ३ वर)

**परतूर लॉयन्स क्लबच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या वाचन लेखन उपक्रमांची सुरुवात आमच्या शाळेपासून झाली आहे. हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे. मुलांना वाचनाची गोडी लागून त्यांचे वाचन कौशल्य निश्चितच अधिक चांगले होईल यात शंकाच नाही.**

**एल. के. बिरादार, मुख्याध्यापक,**
**लाबशा, विद्यालय, परतूर.**

विद्यार्थ्यांना बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांचे वाचन कौशल्य विकसित व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून लॉयन्स क्लबच्या माध्यमातून वाचन पेटी हा उपक्रम राबविला जात आहे. त्याचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होणार आहे.

**लॉ. मनोहर खालापुरे, परतूर**

## धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला एक वर्ष कारावास



जालना / प्रतिनिधी : भूखंड खरेदीच्या व्यवहारानंतर परतफेडीसाठी दिलेला धनादेश खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने अनादरीत झाल्याच्या प्रकरणात मा. ६ वे न्यायदंडाधिकारी, जालना यांनी आरोपी सिताराम उत्तम पवार (रा. निरखेडा तांडा, ता. जि. जालना, ह.मु. विद्युत कॉलनी, जुना जालना) यांना दोषी ठरवून एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच तीन महिन्यांच्या आत ५ लाख ८० हजार रुपये दंड व नुकसानभरपाईची रक्कम फिर्यादीस देण्याचे आदेश दिले असून, दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त चार महिने कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. फिर्यादी कचरूलाल तुळशीराम गजरे, रा. जालना यांनी आरोपी सिताराम पवार यांना भूखंड खरेदीपोटी ९ लाख ९९ हजार ८६० रुपये दिले होते. मात्र सदर भूखंडाचा व्यवहार रद्द झाल्यानंतर रक्कम परत करण्याचे ठरले. त्यापैकी अंशतः रक्कम परतफेड करण्यासाठी आरोपीने क्सिस बँक, जालना शाखेचा ४ लाख रुपयांचा धनादेश फिर्यादीस दिला होता. फिर्यादीने सदर धनादेश विश्वासाने बँकेत वटविण्यासाठी सादर केला असता, आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याने धनादेश अनादरीत झाला. त्यानंतर फिर्यादी कचरूलाल गजरे यांनी फौजदारी न्यायालय, जालना येथे प्रकरण दाखल केले. या प्रकरणात मा. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे तोंडी तसेच कागदोपत्री पुरावे, तसेच झालेला युक्तिवाद विचारात घेत आरोपी सिताराम उत्तम पवार यांना दोषी ठरविले. त्यानुसार न्यायालयाने एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली असून, तीन महिन्यांच्या आत ५ लाख ८० हजार रुपये दंड व नुकसानभरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचे आदेश दिले आहेत. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त चार महिने कारावास भोगावा लागणार आहे. या प्रकरणात फिर्यादी पक्षातर्फे ड. विजय एस. करंडे व ड. प्रशांत एस. कायंदे यांनी काम पाहिले.

## परतूर पोलिसांची कारवाई; आठ गोवंशीय जनावरांची सुटका

### अडीच लाखांहून अधिक किमतीची जनावरे गोशाळेत सुरक्षित; न्यायालयाच्या आदेशापर्यंत योग्य देखभालीच्या सूचना



परतूर, प्रतिनिधी : परतूर पोलिसांनी महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियम तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमांतर्गत दाखल गुन्ह्यात आठ जिवंत गोवंशीय जनावरांची सुटका केली असून, या जनावरांची एकूण अंदाजित किंमत २ लाख ५४ हजार रुपये आहे. सुटका करण्यात आलेल्या जनावरांना सुरक्षिततेच्या दृष्टीने श्रीकृष्ण गोशाळा, पारडगाव, ता. घनसावंगी, जि. जालना येथे ठेवण्यात आले आहे. परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४२३/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र पशू संरक्षण अधिनियमाच्या संबंधित कलमांसह प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियमाच्या तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सुरु असून गुन्ह्यातील आठ गोवंशीय जनावरे पोलिसांच्या ताब्यात आली आहेत. पोलिसांच्या अहवालानुसार सुटका केलेल्या जनावरांमध्ये सहा गायी व दोन लहान गोवंशीय जनावरांचा समावेश आहे. त्यात काळ्या रंगाची तोंडावर पांढरा पट्टा असलेली गाय अंदाजे ५० हजार रुपये, लाल भुरकट रंगाची पांढरे तोंड असलेली गाय ४० हजार, लाल भुरकट रंगाची गळ्याला पांढरा पट्टा असलेली गाय ५० हजार, लाल भुरकट रंगाची गाय ४० हजार, लाल भुरकट रंगाची तोंडावर पांढरे ठिपके असलेली गाय ४० हजार आणि लाल भुरकट रंगाची गोऱ्हा प्रकारची गाय ३० हजार रुपये किंमतीची असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच दोन लहान गोवंशीय जनावरांची प्रत्येकी अंदाजे दोन हजार रुपये किंमत आहे. अशा प्रकारे सर्व जनावरांची एकूण किंमत २ लाख ५४ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. दरम्यान, परतूर पोलिसांनी ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण गोशाळेच्या व्यवस्थापकांना पत्र देऊन ही सर्व जनावरे गोशाळेत सुरक्षित ताब्यात घेण्यास सांगितले आहे. जनावरांना आवश्यक चारा, पाणी, निवारा आणि पशुवैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सक्षम प्राधिकरण अथवा न्यायालयाकडून पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत या गोवंशीय जनावरांची योग्य ती देखभाल व सुरक्षितता राखण्यात यावी, असेही परतूर पोलिसांनी गोशाळा व्यवस्थापनाला कळविले आहे.

## प्रल्हाद ढोकळे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती



प्रल्हाद राव ढोकळे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाडा विभागीय अध्यक्ष शेख रज्जाक यांच्याकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी किसान सभेचे जिल्हा उपाध्यक्ष तसेच नांदीचे सरपंच नाझेर पटेल ,पारनेर सर्कल प्रमुख शेख कलीम, अँड रब्बानी, शालिक शिंदे, लालाभाई पारनेरकर, तालुका उपाध्यक्ष मनोहर भोजने, व इत्यादी उपस्थित होते.